नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६४। किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.)
शुक्रवार ३०/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

ऑक्टोबरमध्येच संगमनेर तालुक्याला पाणी टंचाईच्या झळा !

जलजीवनची कोट्यवधींची कामे अपूर्ण; पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची चिन्हे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -: पावसाचे अत्यल्प प्रमाण, घटत चाललेला भूजलसाठा आणि कोरडे पडू लागलेले जलस्त्रोत यामुळे संगमनेर तालुक्यात पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच ऑक्टोबर महिन्यात ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. सध्या तालुक्यातील नऊ गावे, चार गावठाणे आणि १८ वाड्यांमधील तब्बल १३ हजार ६९४ नागरिकांची तहान टँकरद्वारे भागवली जात आहे. त्यातच वरवंडी गावातील आणखी तीन वाड्यांसाठी टँकर सुरू करण्याचा प्रस्ताव पंचायत समितीकडे दाखल झाल्याने आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पाणी आणण्यासाठी पायपीट, डोक्यावर हंडे !

ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे विदारक चित्र सध्या समोर येत आहे. पाण्यासाठी महिला आणि नागरिकांना दूरवर भटकंती करावी लागत असून, डोक्यावर हंडे घेऊन पाण्याची व्यवस्था करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी टँकरची प्रतीक्षा करावी लागत असल्याने ग्रामीण जनजीवनावर पाणीटंचाईचे सावट गडद झाले आहे. पावसाने पाठ फिरवल्याने विहिरींसह अन्य जलस्त्रोतांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. काही जलस्त्रोत पूर्णपणे कोरडे पडले असून, पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे.

तालुक्यातील दरेवाडी येथे नव्याने पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला आहे. तसेच वरवंडी गावातील आणखी तीन वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी पंचायत समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सध्या टँकरवर अवलंबून असलेल्या गाव-वस्त्यांच्या संख्येत आणखी भर पडण्याची शक्यता आहे. आगामी काळात टँकरची संख्या वाढू शकते, अशी माहिती गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी दिली.

पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने भूजलपातळी खालावली आहे. परिणामी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कमी होत असून, ग्रामीण भागात पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे प्रशासनापुढे आव्हान ठरत आहे.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी अभियान (ग्रामीण) अंतर्गत विविध कामे सुरू आहेत. १०३ ग्रामपंचायतींच्या माध्यमातून २३ ठिकाणी वृक्षलागवडीची कामे सुरू असून, त्यावर १०३ मजूर कार्यरत आहेत. याशिवाय ६५७ घरकुलांची कामे सुरू असून, त्यावर एक हजार २१८ मजूर काम करत आहेत. तालुक्यात वृक्षलागवड आणि घरकुलांची मिळून ६८० कामे सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. संबंधित नोंदीनुसार या कामांवरील मजुरांची एकूण संख्या तीन हजार १२१ असल्याचे सांगण्यात आले.

जलजीवन मिशनचा गाजावाजा; प्रत्यक्षात पाण्यासाठी टँकरच !

तालुक्यातील प्रत्येक गावाला नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा व्हावा, या उद्देशाने जलजीवन मिशनअंतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे हाती घेण्यात आली. मात्र, अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनांची कामे अद्याप अपूर्ण

महाराष्ट्रात परिवर्तनाची नांदी - हर्षवर्धन सपकाळ

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कर्मभूमी आणि खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृहक्षेत्र असलेल्या नागपूर पदवीधर मतदारसंघात काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी पुन्हा एकदा मिळवलेला ऐतिहासिक विजय म्हणजे महाराष्ट्रात सुरू झालेल्या महापरिवर्तनाची नांदी आहे. मुख्यमंत्र्यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची करून दारोदारी फिरणे, बंडखोरांना शांत करणे, शैक्षणिक संस्थाचालकांना धमकावणे आणि मतदानाच्या दिवशी स्वतः बूथवर फेऱ्या मारणे असे सर्व प्रयत्न करूनही नागपूरच्या सुशिक्षित पदवीधरांनी भाजप आणि संघाच्या विचारसरणीला थेट नाकारले आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

विधान परिषदेच्या ५ जागांचे निकाल समोर आल्यानंतर कर्जतमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ बोलत होते. यावेळी त्यांनी नागपूर पदवीधरमधील विजय, पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ट्विट डिलिट करण्याची आलेली नामुष्की, शिक्षक मतदारसंघातील पैठणी-पैशांचा घोडेबाजार, राज्यातील भीषण दुष्काळ आणि ठाण्यातील पूर्णेकर हत्या प्रकरणावरून महायुती सरकारची अक्षरशः पिसे काढली. विधानपरिषद निकालांचे राजकीय विश्लेषण करताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, ज्या मतदारसंघातून कधी नितीन गडकरी निवडून यायचे आणि जेथून सध्याचे मुख्यमंत्री येतात, त्याच नागपुरात सलग दुसऱ्यांदा काँग्रेसचे अभिजित वंजारी विजयी झाले आहेत.

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

संगमनेरकरांनो, पाणी जपून वापरा! दर शनिवारी पाणीपुरवठा बंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन संगमनेर नगरपरिषदेने पाणी बचतीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३१ ऑक्टोबरपासून दर शनिवारी संगमनेर शहरासह सर्व उपनगरांचा नियमित पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. उपलब्ध पाणीसाठा ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरविण्याच्या दृष्टीने शासनाच्या निर्देशानुसार पाणी कपातीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आता संगमनेरकरांना पाण्याचा वापर अधिक काटकसरीने करावा लागणार आहे.

राज्यात यंदा पावसाच्या अनिश्चिततेमुळे अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उपलब्ध पाणीसाठा पुढील पावसाळ्यापर्यंत पुरेसा राहावा, यासाठी शासनाने आतापासूनच पाणी वापराचे नियोजन करण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. पाण्याची वाढती गरज आणि भविष्यात उद्भवू शकणारी टंचाई लक्षात घेता, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध साठ्याचा जपून वापर करणे ही काळाची गरज बनली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका आणि ग्रामपंचायतींना पाणीपुरवठ्याचे नियोजन करून काटकसरीने पाणी वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर संगमनेर नगरपरिषदेने शहरातील पाणीपुरवठ्याबाबत हा निर्णय घेतला आहे. ३१ ऑक्टोबरपासून दर शनिवारी शहरातील सर्व भागांचा नियमित पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी त्यानुसार पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

पाणी बचतीसाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे- पाणीपुरवठ्यातील कपात ही संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि उपलब्ध पाणीसाठा दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा, नळ उघडे ठेवू नयेत, पाण्याची गळती तातडीने दुरुस्त करावी तसेच दैनंदिन वापरासाठी आवश्यक तेवढेच पाणी वापरावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. पाणी ही मर्यादित नैसर्गिक संपत्ती असून, तिचे योग्य नियोजन केल्यास भविष्यातील संभाव्य संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते. त्यामुळे नगरपरिषदेच्या पाणी कपातीच्या निर्णयाला नागरिकांनी सहकार्य करावे आणि पाणी बचतीची सवय अंगीकारावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008 GOVT. APPROVED VALUER
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
*नियम व अटी लागू
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

राजपाल
खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
वस्त्रांची विश्वसनीय अखंड परंपरा राजपाल

सणासुदीत सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50%* पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
ॲडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
नियम व अटी लागू
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

पाच-सहा महिने मीटर रीडिंग नाही वीजबिलांचा मात्र ग्राहकांना भुर्दंड

महावितरणच्या कारभाराविरोधात नाराजी

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले - अकोले तालुक्यात घरगुती वीज ग्राहकांच्या मीटर रीडिंगबाबत अनियमितता होत असल्याच्या तक्रारी समोर येत असून, पाच ते सहा महिने मीटर रीडिंग न घेता अचानक वीजबिले पाठविली जात असल्याचा आरोप ग्राहकांकडून केला जात आहे. एकीकडे वेळेवर रीडिंग घेतले जात नसल्याने ग्राहकांना प्रत्यक्ष वीजवापराचा हिशेब मिळत नाही, तर दुसरीकडे 'मीटर फॉल्ट' असल्याचे सांगून नवीन मीटर बसविण्याचा आग्रह धरला जात असल्याच्या तक्रारींमुळे महावितरणच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी मागणी अकोले तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल बाळासाहेब नाईकवाडी यांनी केली आहे.

वीज ग्राहकांनी नियमितपणे वीजबिल भरणे अपेक्षित असताना, संबंधित कर्मचाऱ्यांकडूनच मीटर रीडिंग घेण्यास विलंब होत असेल, तर त्याचा आर्थिक फटका ग्राहकांनी का सहन करावा, असा सवाल उपस्थित होत आहे. काही ठिकाणी पाच ते सहा महिने मीटर रीडिंगसाठी कर्मचारी फिरकत नसल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. त्यानंतर एकाच वेळी अनेक महिन्यांच्या वीजवापराचे बिल आकारले गेल्यास ग्राहकांच्या माथी मोठ्या रकमेचे बिल पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे आधीच महागाईचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबांचे मासिक आर्थिक गणित कोलमडत आहे.

मीटर रीडिंग नाही, मग बिलाची आकारणी कशी?

वीज ग्राहकांच्या घरातील मीटरचे रीडिंग नियमितपणे घेऊन प्रत्यक्ष वीजवापरानुसार बिल आकारणे ही महावितरणची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, अनेक महिने रीडिंग न घेतल्याच्या तक्रारी खऱ्या असतील, तर संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. रीडिंग न घेण्यामागील कारण काय? ग्राहकांना अंदाजे बिले दिली जातात का? अनेक महिन्यांचा वीजवापर एकत्रितपणे आकारताना ग्राहकांना योग्य माहिती दिली जाते का? या प्रश्नांची उत्तरे महावितरणने स्पष्ट करावीत अशी मागणी होत आहे.

'मीटर फॉल्ट'च्या नावाखाली मीटर बदलण्याचा आग्रह?

काही ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, वीज मीटरमध्ये दोष असल्याचे सांगून नवीन मीटर बसविण्याचा आग्रह धरला जात आहे. मात्र, संबंधित मीटर खरोखरच नादुरुस्त आहे का, त्याची तांत्रिक तपासणी करण्यात आली आहे का आणि मीटर बदलण्याची आवश्यकता असल्यास त्यामागील कारण काय, याबाबत ग्राहकांना स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे.

मीटरमध्ये दोष असल्यास नियमानुसार त्याची तपासणी करून वस्तुस्थिती ग्राहकांना समजावून सांगावी. मीटर बदलण्याची गरज असल्यास त्याचे कारण, लागू असलेले नियम आणि संभाव्य खर्च यांची माहिती पारदर्शकपणे द्यावी. योग्य तांत्रिक तपासणी आणि आवश्यक प्रक्रिया न करता ग्राहकांवर मीटर बदलण्यासाठी दबाव आणला जात असल्यास अशा तक्रारींची चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे

अकोले तालुक्यातील वीज ग्राहकांच्या तक्रारींची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी. ज्या ग्राहकांचे अनेक महिन्यांपासून मीटर रीडिंग घेतलेले नाही, त्यांच्या तक्रारींची तपासणी करून प्रत्यक्ष वीजवापरानुसार बिलांची पडताळणी करावी. चुकीची किंवा अवाजवी आकारणी झाल्याचे आढळल्यास नियमानुसार बिलांमध्ये दुरुस्ती करावी. तसेच मीटर बदलण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवून ग्राहकांना विश्वासात घ्यावे.

वीज ही प्रत्येक घराची मूलभूत गरज आहे. त्यामुळे मीटर रीडिंगमधील अनियमितता, वीजबिलांची आकारणी आणि मीटर बदलण्याबाबतच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्राहकांनी वीजबिल वेळेवर भरावे, अशी अपेक्षा करणाऱ्या महावितरणनेही आपली जबाबदारी तितक्याच तत्परतेने पार पाडावी. ग्राहकांची आर्थिक पिळवणूक आणि गैरसोय थांबविण्यासाठी नियमित मीटर रीडिंग, योग्य बिल आकारणी आणि तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याची मागणी अमोल बाळासाहेब नाईकवाडी यांनी केली आहे.

जगदंबा फूड प्रॉडक्ट्स् बाबत घाईघाईने निष्कर्ष नको- चंदन घुले

कच्च्या मालाच्या तपासणीप्रकरणी जगदंबा फूडची भूमिका

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - कष्ट, प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेच्या जोरावर व्यवसायात स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या चंदन मसाले अर्थात जगदंबा फूड प्रॉडक्ट्स यांच्याबाबत गेल्या दोन-तीन दिवसांपासून विविध चर्चा सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीने आपली भूमिका स्पष्ट केली असून, कच्च्या मालाच्या तपासणीसंदर्भातील वस्तुस्थिती समजून घेऊनच कोणताही निष्कर्ष काढावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

चंदन मसाले हा केवळ एक व्यावसायिक ब्रँड नसून, अनेक वर्षांच्या मेहनतीतून आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून उभा राहिलेला व्यवसाय आहे. केरूजी भिवाजी घुले ऊर्फ दादा यांनी कष्टाच्या बळावर या व्यवसायाची उभारणी केली. व्यापारी आणि ग्राहकांशी विश्वासाचे नाते जपत, गुणवत्तेला महत्त्व देत त्यांनी व्यवसायाची वाटचाल सुरू ठेवली आहे. गेल्या वीस वर्षांपासून बाजारपेठेत आपला माल टिकवून ठेवण्यासाठी आणि त्याची गुणवत्ता जपण्यासाठी प्रयत्नशील असल्याची भूमिका कंपनीने मांडली आहे.

कच्च्या मालाच्या तपासणीबाबत कंपनीचा खुलासा

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, गुजरातमधून आलेला धना आणि बडीशेप हा कच्चा माल प्लास्टिकच्या गोण्यांमध्ये होता. त्यामुळे संबंधित गोण्यांवर पॅकिंगची तारीख आणि एक्सपायरी डेट नमूद नसल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. या मालाची तपासणी करण्यासाठी तो संबंधित यंत्रणेकडे देण्यात आला असून, तपासणी अहवाल येईपर्यंत माल सील करण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही होईल, असे कंपनीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

येथे महत्त्वाची बाब म्हणजे कच्च्या मालाच्या गोण्यांवर पॅकिंग व एक्सपायरी डेट नसल्याचा मुद्दा आणि ग्राहकांसाठी तयार केलेल्या, पॅकबंद मसाल्यांच्या गुणवत्तेचा मुद्दा या दोन्ही बाबींची सरमिसळ न करता वस्तुस्थितीच्या आधारे विचार होणे आवश्यक आहे. संबंधित मालाच्या स्वरूपानुसार लागू असलेले नियम, तपासणीचे निष्कर्ष आणि अधिकृत अहवाल यांच्या आधारेच या प्रकरणाचे योग्य मूल्यमापन होऊ शकते.

गुणवत्तेशी तडजोड न करण्याची भूमिका

व्यवसायामध्ये दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी ग्राहकांचा विश्वास ही सर्वांत मोठी कमाई असते. चंदन मसाले यांनीही गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करणार नसल्याची भूमिका मांडली आहे. बाजारपेठेत कमी दर्जाचा माल जाणार नाही, याची काळजी घेण्यावर कंपनीचा भर असल्याचे निवेदनात नमूद आहे.

सध्या सुरू असलेल्या चर्चांमुळे व्यापारी बांधवांच्या मनात कोणतीही शंका राहू नये, यासाठी कंपनीने संवाद साधण्याची भूमिका घेतली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मालाचे वितरण सुरळीत सुरू असून, त्यामध्ये कोणतीही अडचण आलेली नसल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे.

॥ जनसेवा हिच ईश्वर सेवा ॥

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर E-mail - cosangamner@gmail.com

जाहीर सूचना

मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचेमार्फत संगमनेर नगरपरिषदेसाठी खालील कामाचे अंदाजपत्रक बनविणे कामी योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून दरपत्रक मागवण्यात येत आहे.

कामाचे नाव
संगमनेर नगरपरिषद कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रामध्ये संगणक प्रणाली, सर्व्हर, टोकन व्यवस्थापन व इतर प्रणालीचे अत्याधुनिकीकरण करणे.

१. दरपत्रक दि.३०/१०/२०२६ पासून दि.०३/११/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.
२. उपरोक्त कामाच्या संदर्भात अधिक माहिती करिता संगणक विभाग, संगमनेर नगरपरिषद येथे संपर्क साधावा.
३. आलेले एक किंवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद यांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र.संनपा/संगणक / R११९/२०२६-२७
दिनांक: २८/१०/२०२६

स्वाक्षरीत /-
(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

पान १ वरून ऑक्टोबरमध्येच संगमनेर...

असल्याने ग्रामस्थांना अपेक्षित दिलासा मिळालेला नाही. एकीकडे पाणीपुरवठा योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असताना दुसरीकडे गावोगावी टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येत आहे.

या योजनांची कामे वेळेत पूर्ण होऊन त्या प्रत्यक्ष कार्यान्वित झाल्या असत्या, तर पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असता आणि टँकरवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत झाली असती. त्यामुळे अपूर्ण योजनांचा आढावा घेऊन त्यांची कामे तातडीने पूर्ण करणे, पाणीपुरवठ्याच्या स्रोतांची स्थिती तपासणे आणि टंचाईग्रस्त वाड्या-वस्त्यांना नियमित पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक बनले आहे.

हिवाळ्यातच टँकर, तर उन्हाळ्यात काय?

ऑक्टोबर महिन्यातच हजारो नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने पुढील उन्हाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे. पाण्याचे उपलब्ध स्रोत, टँकरच्या फेऱ्या आणि गावनिहाय गरज यांचे नियोजन करून प्रशासनाने आतापासूनच उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा, उन्हाळ्याची तीव्रता वाढताच ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दारूबंदी कार्यकर्त्यांची माहिती दारूविक्रेत्यांपर्यंत पोहोचते कशी?

अकोले पोलिसांविरोधात पोलीस महासंचालकांकडे तक्रार

संबंधितांची चौकशी करून निलंबनाची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले - अवैध दारूविक्रीविरोधात आवाज उठवणाऱ्या आणि पोलिसांकडे तक्रारी करणाऱ्या दारूबंदी कार्यकर्त्यांची नावे व तक्रारींची माहिती संबंधित दारूविक्रेत्यांपर्यंत पोहोचवली जात असल्याचा गंभीर आरोप अकोले तालुका दारूबंदी आंदोलनाने केला आहे. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेकडूनच तक्रारदारांची गोपनीयता धोक्यात येत असल्याचा आरोप झाल्याने अकोले तालुक्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी पोलिसांवर निलंबनाची कारवाई करावी आणि संबंधितांच्या बदल्या कराव्यात, अशी मागणी राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अकोले सहकारी साखर कारखाना परिसरात खुलेआम अवैध दारूविक्री सुरू असल्याची तक्रार पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्याकडे करण्यात आली होती. दारूचा साठा कुठे ठेवण्यात आला आहे, याची माहितीही पोलिसांना देण्यात आली. मात्र, संबंधित ठिकाणी कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांनी तक्रारदाराचे नाव आणि त्याने पाठविलेला संदेश संबंधित महिला दारूविक्रेत्याला सांगितल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. अवैध धंद्यांविरोधात कारवाई व्हावी, या अपेक्षेने पोलिसांना माहिती देणाऱ्या कार्यकर्त्यांचीच ओळख उघड होत असेल, तर त्यांनी तक्रार कोणाकडे करायची, असा सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

देवठाण, गणोरे आणि समशेरपूर परिसरातील अवैध दारूविक्रीविरोधात तक्रारी केल्यानंतर संबंधित दारूविक्रेत्याचे कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या भागातील पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. तक्रारींची माहिती संबंधित विक्रेत्यांपर्यंत नेमकी कशी पोहोचली, याचा तपास करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी आंदोलनाच्या वतीने करण्यात आली आहे. अवैध दारूविक्रीविरोधात तक्रार करणाऱ्या नागरिकांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण मिळणे अपेक्षित असताना, त्यांच्या नावांची माहिती बाहेर गेल्याचा आरोप होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा प्रकारांमुळे भविष्यात अवैध धंद्यांविरोधात तक्रार करण्यासाठी नागरिक पुढे येण्यास धजावणार नाहीत, अशी चिंता दारूबंदी आंदोलनाने व्यक्त केली आहे.

अकोले बीटसह देवठाण, गणोरे आणि समशेरपूर बीटमधील संबंधित पोलिसांच्या भूमिकेची सखोल चौकशी करावी, संबंधित फोन कॉल आणि संदेशांची नियमानुसार तपासणी करावी, तसेच तक्रारदारांची माहिती उघड झाल्याचे निष्पन्न झाल्यास दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. उपअधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांनाही यासंदर्भात स्वतंत्र निवेदने देण्यात आली आहेत.

या प्रकरणात प्रशासनाने तातडीने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करावी आणि संबंधितांवर योग्य कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. येत्या पंधरा दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास अकोले पोलीस ठाण्यासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

अवैध दारूविक्रीला आळा घालण्याची जबाबदारी पोलिसांवर असताना, त्यांच्याकडे तक्रार करणाऱ्यांचीच माहिती विक्रेत्यांपर्यंत पोहोचत असल्याचा आरोप गंभीर आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य बाहेर येणार का आणि तक्रारदारांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी पोलीस प्रशासन काय पावले उचलणार, याकडे आता अकोले तालुक्याचे लक्ष लागले आहे.

डिजिटल अरेस्टच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी कठोर कायद्याची गरज

मुंबई (वृत्तसंस्था)
सर्वोच्च न्यायालयाने डिजिटल अटकेद्वारे होणाऱ्या सायबर फसवणुकीला 'डिजिटल दरोडा' असे संबोधले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी म्हटले की, हा सामान्य खंडणीपेक्षा अधिक गंभीर गुन्हा आहे. व्हिडिओ कॉलद्वारे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य केले जात आहे.

अशा निर्दयी गुन्हेगारांशी अत्यंत कठोरपणे वशरश्र केले पाहिजे. न्यायालयाने असेही म्हटले की, कायद्यात खटला सुरू होण्यापूर्वी शिक्षा देण्याची तरतूद असेल, तर तिचाही वापर केला पाहिजे.सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर गौरव कुमार साहा आणि निधी भंडारी यांच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती.दोघांनीही त्यांच्याविरुद्ध १२ राज्यांमध्ये दाखल झालेले सायबर गुन्ह्यांचे ३५ खटले एकत्रित करण्याची मागणी केली होती. आरोप आहे की, त्यांच्या कंपनीच्या बँक खात्याचा वापर फसवणुकीची रक्कम जमा करण्यासाठी आणि पुढे पाठवण्यासाठी करण्यात आला.

याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की ते स्वतः फसवणुकीचे बळी आहेत आणि त्यांच्या माहितीशिवाय त्यांच्या खात्याचा वापर करण्यात आला. यावर न्यायालयाने म्हटले- आरोपींच्या सोयीसाठी पीडितांना दिल्लीला बोलावता येणार नाही. वेगवेगळ्या राज्यांमध्ये सुरू असलेल्या तपासावर परिणाम करण्याची परवानगीही देता येणार नाही.

यापूर्वी २८ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, डिजिटल अरेस्टची फौजदारी कायद्यात औपचारिकपणे व्याख्या करून कठोर शिक्षेसह स्वतंत्र गुन्हा म्हणून घोषित करण्याचा विचार केला जाऊ शकतो. सीजेआय सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने म्हटले की, अशा प्रकरणांमध्ये आरोपीविरुद्ध ठोस पुराव्यांच्या आधारे मत बनल्यानंतर त्याची मालमत्ता गोठवली जाऊ शकते.

दुष्काळी मदतीच्या जाचक अटी हटविल्या

पात्र शेतकऱ्यांना ५ हजार रुपये मिळणार

मुंबई (वृत्तसंस्था)
दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या राज्यातील ३०४ तालुक्यांमधील शेतकऱ्यांना ५ हजार रुपये अग्रिम मदतीसाठी घातलेल्या जाचक अटी व शर्ती रद्द करण्याचा निर्णय मदत व पुनर्वसन विभागाने घेतला आहे. त्यामुळे या तालुक्यांमधील सर्व पात्र शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची तात्काळ अग्रिम मदत मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. दिवाळीच्या तोंडावर मिळालेल्या या निर्णयामुळे राज्यातील सुमारे १.५ कोटी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शासन निर्णयानुसार, राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे, त्या सर्वांना सरसकट ५,००० रुपयांची मदत मिळणार आहे. ही रक्कम थेट 'डीबीटी'द्वारे लाभार्थ्यांच्या खात्यावर पाठवली जाणार आहे. १ नोव्हेंबर २०२५ पासून आजतागायत ज्या शेतकऱ्यांनी विविध शासकीय योजनांसाठी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यांना पुन्हा ई-केवायसी करण्याची अट शिथिल करण्यात आली आहे. ज्या वन पट्टाधारक शेतकऱ्यांना अद्याप 'ग्रीस्टॅक' शेतकरी ओळख क्रमांक मिळालेला नाही, त्यांना केवळ ई-केवायसीच्या आधारे मदत वितरित केली जाईल.कोण असणार पात्र?शासनाने मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, केंद्र व राज्य शासनाचे २५ हजारांपेक्षा अधिक वेतन असणारे अधिकारी-कर्मचारी, सार्वजनिक उपक्रम व अनुदानित संस्थांचे उच्च वेतन घेणारे कर्मचारी, शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणारे नागरिक, २५ हजारांपेक्षा जास्त निवृत्तीवेतनधारक आणि विविध सहकारी संस्थांचे उच्चपदस्थ पदाधिकारी यांना पूर्वीच्या निर्णयाने मदतीतून वगळण्यात आले होते. मात्र आता शासनाने निर्णयात बदल करत सर्वांना अग्रिम मदतीसाठी पात्र केले आहे.सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवरदुष्काळ जाहीर केलेल्या जिल्ह्यांमधील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढील आदेशापर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सहकार विभागाने बुधवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका तसेच न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिलेल्या आणि ज्या संस्थांच्या निवडणुकीतील नामनिर्देशनाचा टप्पा आदेशापूर्वीच सुरू झाला आहे, अशा संस्थांना या निर्णयातून वगळण्यात आले आहे.मदत कर्जापोटी वळती करून घेऊ नका, बँकांना निर्देशनैसर्गिक आपत्तीच्या काळात मिळणारी ही शासकीय मदतीची रक्कम बँकांनी कोणत्याही जुन्या कर्जापोटी किंवा इतर कारणांसाठी वळती करून घेऊ नये, असे कडक निर्देश देण्यात आले आहेत.

१४ हजार ७८७ कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना दिलासा

शासनाची वेतनश्रेणीला मंजुरी - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ अविरतपणे आरोग्यसेवा देणाऱ्या राज्यातील १४ हजार ७८७ पात्र कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वार्षिक ९८३.८० कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना बळ मिळाले असून, त्यांना आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण दिलासा मिळणार आहे.

राज्यातील कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आमदार खताळ यांनी २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या मागणीला यश आले असून, शासनाच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे किंवा त्यांच्या वेतनात भरीव वाढ करून त्यांना आर्थिक न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार खताळ यांनी अधिवेशनात मांडली होती. आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या सेवेचा योग्य मोबदला देऊन त्यांना सन्मान मिळणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण आणि शहरी भागांतील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. आरोग्यविषयक विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णसेवा, माता-बाल आरोग्य, लसीकरण, आरोग्यविषयक जनजागृती तसेच विविध आरोग्य मोहिमांमध्ये हे कर्मचारी सातत्याने कार्यरत असतात. अनेक कर्मचाऱ्यांनी दहा वर्षांहून अधिक काळ सेवा बजावली असतानाही नोकरीतील अनिश्चितता आणि वेतनासंबंधीच्या प्रश्नांमुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा, यासाठी आमदार खताळ यांनी अधिवेशनात शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीची दखल घेत सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक निर्णय घेतल्याने आमदार अमोल खताळ यांनी त्यांचे विशेष आभार मानले आहेत.

थोरात कारखान्याच्या वतीने साखर वाटप कार्यक्रम जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे मा. महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील सहकारासाठी दीपस्तंभ ठरलेल्या सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम शेतकरी सभासद ऊस उत्पादक व कामगार यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. दीपावलीच्या निमित्ताने शेअर्स पूर्ण असणाऱ्या सभासदांना २ नोव्हेंबर २०२६ ते ४ नोव्हेंबर २०२६ या काळात मोफत ३० किलो साखर देण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे. याबाबत अधिक माहिती देताना पांडुरंग घुले म्हणाले की, थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या

आदर्श तत्त्वांवर कारखान्याची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीनिमित्त कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपये प्रति टन प्रमाणे अनुदान देण्यात आले आहे याचबरोबर कामगारांना २० टक्के बोनस व तीन दिवसांचे सानूगृह अनुदान देण्यात येणार आहे.

तर दरवर्षीप्रमाणे ३०/०९/२०२६ अखेर ज्या सभासदांचे शेअर्स मंजूर व पूर्ण आहेत अशा सभासदांना ३० किलो मोफत साखर देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे . ज्या सभासदांची शेअर्स रक्कम अपूर्ण आहे त्यांची यादी गावातील सेवा सोसायट्यांमध्ये किंवा कारखान्याच्या गट कार्यालयात उपलब्ध आहे.

साखर गोडाऊन क्रमांक १२ व १३ मधून सोमवार दिनांक २ नोव्हेंबर २०२६ ते ४ नोव्हेंबर २०२६ या काळात सभासदांना मोफत ३० किलो साखर वाटप केली जाणार आहे साखर वाटपासाठी सभासदांनी ओरिजनल ओळखपत्र आणले गरजेचे आहे. ज्या सभासदांनी त्यांचे ओळखपत्र काढलेले नाही. अशा सभासदांनी साखर घेण्यासाठी येताना एक फोटो व आधार कार्ड घेऊन यावा. तरी सर्व सभासद बंधू-भगिनी साखर वाटप कार्यक्रमाप्रमाणेच साखर घेऊन जावी व साखर वाटपाबाबत कारखान्यास सहकार्य करावे असे आवाहन सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

पुंजा किसन रहाणे यांचे वृद्धापकाळाने निधन

शिक्षक नेते आर. पी. रहाणे यांना पितृशोक

संगमनेर (प्रतिनिधी)

चंदनापुरी (ता. संगमनेर) येथील रहिवासी पुंजा किसन राहाणे यांचे बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने राहाणे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शिक्षक नेते आर. पी. राहाणे सर यांना पितृशोक झाला आहे.

पुंजा किसन राहाणे हे कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने कुटुंबातील ज्येष्ठ आधारवड हरपल्याची भावना



नातेवाइकांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्या जाण्याने राहाणे परिवाराची मोठी हानी झाली आहे. गुरुवारी सकाळी चंदनापुरी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दिवंगत राहाणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत राहाणे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

त्यांच्या पश्चात पत्नी अनुसया पुंजा राहाणे, भावजय हौसाबाई निवृत्ती राहाणे, मुले रामदास पुंजा राहाणे सर व लक्ष्मण पुंजा राहाणे, मुलगी सौ. मनिषा भगवान घनवट, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. पुंजा किसन राहाणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

हिमालय, पश्चिम घाटाचे संरक्षण व्हावे - पोपटराव पवार

जागतिक तापमानवाढीमुळे हिमालयातील नैसर्गिक घडामोडींचे मान्सून आणि परतीच्या मान्सूनवर दूरगामी परिणाम होत आहेत. पावसाचे बिघडलेले चक्र सुधारण्यासाठी हिमालयासोबतच पश्चिम घाटाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. या दोन्ही पर्वतरांगांचे संवर्धन हीच मानवी अस्तित्वाची खरी विकासवाट आहे असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या आदर्श गाव संकल्प व प्रकल्प कृती समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी केले.

नवी दिल्ली येथे 'इनिशिएटिव्ह ऑफ मीडिया वुमेन्स नेपाळ' यांच्या वतीने आयोजित भारत-नेपाळ कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हण्णून बोलत होते. नेपाळमधील रसुवा जिल्ह्यातील भोटेकोशी नदीच्या खोऱ्यात हिमकेडा कोसळण्याच्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर तापमानवाढीच्या परिणामांवर चर्चा करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भारत आणि नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयांनी यासाठी पुढाकार घेतला होता. कार्यालयाचे प्रमुख डॉ. सुरेन्द्र थापा, सीबीआयचे माजी संचालक डॉ. कार्तिकेयन, फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे अध्यक्ष डॉ. दीपक जैन आणि इंडो-नेपाळ चॅप्टरचे मुख्य समन्वयक वेद प्रकाश शर्मा उपस्थित होते. पवार म्हणाले, की अल्पावधीत होणारी अतिवृष्टी ही भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांसमोरील गंभीर समस्या आहे. दुष्काळ आणि अतिवृष्टीसारख्या टोकाच्या परिस्थितीमागे पर्यावरणाचे ढासळलेले संतुलन हे महत्त्वाचे कारण आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात अन्न आणि पाण्याचे संकट अधिक गंभीर होणार आहे. हिवरे बाजारमध्ये गेल्या ३५ वर्षांपासून पाणलोट विकासाची कामे सुरू आहेत. या प्रयत्नांमुळे जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनाला चालना मिळाली आहे. यंदा केवळ ४० मिलिमीटर पाऊस पडूनही योग्य जलव्यवस्थापन आणि पीक नियोजनाच्या बळावर गावातील शेतकऱ्यांनी १५ कोटी रुपयांचा कांदा विकला.

परभवानंतर शिवसेना - भाजपामध्ये कलगीतुरा

मुंबई (वृत्तसंस्था)

विधान परिषदेच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाल्याने शिंदे सेना आणि भाजपमध्ये चांगलीच जुंपली आहे. दोन्हीकडून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे महायुतीत भडका उडाला आहे. भाजपने तर थेट शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे शिंदे सेनेनेही भाजपचा बुरखा टराटरा फाडला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि अमरावतीत तुमच्या नेत्यांनी कुणाचा प्रचारा केला? युती धर्म फक्त आम्हीच पाळायचा का? असा सवाल शिंदे सेनेने भाजपला केला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये चांगलाच भडका उडाला आहे.शिंदे सेनेचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी मीडियाशी संवाद साधताना भाजपवर घणाघाती हल्ला चढवला आहे. विधान परिषद निवडणुकीत महायुतीत समन्वय असता तर पाचही जागा निवडून आल्या असत्या. भाजप मुख्य भूमिकेत होता. पुण्यातील एक जागा शिवसेनेला मिळावी, अशी आमची इच्छा होती. भाजपने तीनही उमेदवार जाहीर केले.

शिवसेनेकडून मंगेश चिवटे यांनी अर्ज दाखल केला होता. तो मागे घेतला. सचिन सानप यांना शिवसेनेने पाठिंबा दिला होता. एक जागा आम्हाला द्यावी ही आमची पहिल्यापासून मागणी होती, असं आनंद परांजपे म्हणाले.अब्दुल सत्तार यांनी विरोधात काम केले, असा नवनाथ बन यांनी आरोप केला आहे. सत्तार यांनी विरोधात भूमिका घेतली तर मग आमदार प्रशांत बंब यांनी कोणाचा प्रचार केला?

भाजपच्या आमदारांनी कोणाचा प्रचार केला याचा तपास करावा. अमरावतीमध्ये शिवसेनेच्या विरुद्ध तीन बंडखोर उमेदवार होते. अनिल बोंडे यांच्या भगिनी लढत होत्या, याकडेही परांजपे यांनी लक्ष वेधले.भाजप जगभरातील मोठा पक्ष आहे. देशातील मोठा पक्ष आहे. राज्यातील मोठा पक्ष आहे. तरीही त्यांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे, असा चिमटा काढतानाच पुण्यातील दोन्ही जागा भाजपच्या सीटिंग नव्हत्या. भाजपने प्रत्येक निवडणुकीत सगळ्या जागा आम्हीच लढवणार या गोष्टीला मुरड घातली पाहिजे, असा सल्लाही परांजपे यांनी दिला. अमरावतीमध्ये तीन बंडखोर उमेदवार होते. बन यांनी शोधपत्रकरिता करावी. अमरावतीत काय घडलं ते पाहावं, असं सांगतानाच भाजपने मित्र पक्षाला योग्य सन्मान द्यावा. मोठ्या भावाने योग्य सन्मान दिला तर बरं होईल, असंही त्यांनी म्हटलंय. विद्यार्थ्यांची जी आंदोलने झाली त्याचा या निवडणुकीत परिणाम झाला का? याचाही विचार करायला हवा. समन्वय चांगला असता तर निकाल ५-० लागला असता, असंही ते म्हणाले.

संजय राऊत, निखिल वागळे यांच्या अडचणीत वाढ

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या विरोधात आक्षेपार्ह टिपणी केल्याचा आरोप झालेले शिवसेना (यूबीटी)चे खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. येत्या १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीवेळी स्वत: राऊत यांनी हजर राहावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दुसरीकडे पत्रकार निखिल वागळे यांना आभासी मार्गाने हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले.

आक्षेपार्ह टिपणी केल्याच्या प्रकरणी सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनने राऊत आणि वागळे यांच्याविरोधात याचिका दाखल केली होती. यावर न्या. अरविंद कुमार आणि न्या. विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने उभय आरोपींना १७ तारखेला दुपारी सुनावणीवेळी हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. खा. राऊत आणि वागळे यांच्याविरोधात अवमान खटला चालवण्यास ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी सहमती दर्शवली होती. या प्रकरणामुळे न्यायालयीन अवमानाच्या मुद्द्यावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. १७ नोव्हेंबरच्या सुनावणीत न्यायालय काय भूमिका घेते, याकडे राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

कोकणगाव -शिवापूर परिसरात पाणीटंचाई

ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; महिलांचा संताप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील कोकणगाव - शिवापूर परिसरात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच प्रत्येक प्रभागातील पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करावे, जर पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढून तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा कोकणगाव शिवापूर येथील ग्रामस्थांसह महिलांनी ग्रामपंचायत प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

सध्या पाऊस नसल्यामुळे सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होऊ लागले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे नदीला पाणी असतानाही ग्रामपंचायत प्रशासन पाण्याचे योग्य नियोजन करत नाही त्यामुळे पाणी टंचाईचाला आम्हा सर्व ग्रामस्थांसह महिलांना सामोरे जावे लागत आहे गावाला पाणीपुरवठा कधी होणार, किती वेळ पाणी मिळणार आणि कोणत्या प्रभागात कोणत्या दिवशी पाणी सोडले जाणार, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने ग्रामस्थां मध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे .

पाण्याची समस्या गंभीर होत असताना मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने ठोस उपाययोजना करत नाही तसेच पाणीपुरवठ्याचे कुठलेच वेळापत्रक ग्रामपंचायत प्रशासनाकडे नाही त्यामुळे त्यांनी पाणी सोडण्याचे वेळापत्रक लवकरात लवकर जाहीर करावे अशी मागणी ग्रामस्थ आणि महिलांनी केली आहे.

योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविणार - मुख्यमंत्री

अहिल्यानगर - शासकीय योजनांची व्याप्ती वाढविणे, अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता तपासणे महत्वाचे असल्याने यासाठी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियुक्त क्रिसस माय इंडिया या संस्थेमार्फत विविध विभागांच्या योजनांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि योजना पश्चात सर्वेक्षणाबाबत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने योजनांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. योजनांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास, लाभार्थ्यांच्या माहितीचे विश्लेषण, योजनांमुळे साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यमापन आणि त्यातून पुढील सुधारणांसाठी आवश्यक बाबी निश्चित करणे, अशा विविध स्तरांवर काम केले जात आहे. राज्यातल्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत योजनांचा लाभ

पोहोचविण्यासाठी या सर्वेक्षणांचा चांगला उपयोग होऊ शकतो. योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वेक्षणातून मिळणारी माहिती केवळ माहितीपुरती मर्यादित न ठेवता, त्यातून प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा घडवून आणण्यास मदत होईल. उपलब्ध माहितीच्या आधारे योजनांची सद्य:स्थिती समजून घेणे, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे शक्य होणार आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांनी आवश्यक सहकार्य करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या सर्वेक्षणाच्या माध्यमातून योजनांबद्दलची अचूक माहिती मिळण्यास मदत होईल तसेच शासनाच्या योजनांसाठी असणारा प्रतिसाद समजण्यास मदत होईल. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून अचूक डेटा बेस तयार होईल आणि लोकांना शासकीय योजनांचा अधिक लाभ मिळण्यास मदत होईल. या सर्वेक्षणातून शासकीय योजनांबाबत अधिक विश्वासार्हता निर्माण होऊन राज्य शासनास अचूक माहिती मिळेल आणि गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल.

संपादकीय...

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथीनिमित्त

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
ग्रामविकास आणि समाजप्रबोधनाचे महान कार्य

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील थोर संत, समाजसुधारक, कीर्तनकार आणि राष्ट्रप्रेमी विचारवंत होते. त्यांनी भजन, कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली. अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. ग्रामविकास, स्वच्छता, शिक्षण, राष्ट्रीय एकात्मता आणि मानवसेवा हे त्यांच्या विचारांचे प्रमुख विषय होते. अध्यात्म आणि समाजसेवा यांची सांगड घालून त्यांनी समाजाला नवी दिशा दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या गावात झाला. त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे होते. लहानपणापासूनच त्यांना भजन, कीर्तन आणि अध्यात्माची आवड होती. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांचे जीवन जवळून पाहिले होते. समाजातील अज्ञान, गरिबी, अंधश्रद्धा आणि अनिष्ट प्रथा दूर झाल्या पाहिजेत, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी आपल्या विचारांचा आणि कीर्तनाचा उपयोग समाजप्रबोधनासाठी केला. तुकडोजी महाराजांनी धार्मिक कार्यक्रमांना सामाजिक जागृतीचे माध्यम बनवले. त्यांच्या भजनांमधून भक्तीबरोबरच परिश्रम, स्वावलंबन, राष्ट्रप्रेम आणि मानवतेचा संदेश दिला जात असे. त्यांनी लोकांना केवळ देवाची पूजा करण्यापेक्षा माणसाची सेवा करण्याचे महत्त्व पटवून दिले. गरीब, गरजू आणि वंचित व्यक्तींना मदत करणे, समाजातील भेदभाव दूर करणे आणि सर्वांना समान वागणूक देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे 'ग्रामगीता' हा ग्रंथ. या ग्रंथातून त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली. गावाचा विकास करण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. गावातील रस्ते स्वच्छ ठेवणे, पाण्याचे स्रोत जपणे, शिक्षणाचा प्रसार करणे, शेतीमध्ये सुधारणा करणे आणि गावातील समस्या सामूहिक प्रयत्नांतून सोडवणे यावर त्यांनी भर दिला. गावाच्या विकासासाठी शासनाबरोबरच ग्रामस्थांचाही सहभाग महत्त्वाचा आहे, हा विचार त्यांनी मांडला. ग्रामगीतेमध्ये त्यांनी स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, ग्रामोद्योग, सहकार आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. प्रत्येक गाव स्वच्छ, सुंदर आणि स्वावलंबी झाले पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती. गावातील लोकांनी श्रमदान करून सार्वजनिक कामे करावीत आणि गावाच्या प्रगतीसाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असा संदेश त्यांनी दिला. आजही ग्रामविकासाच्या कार्यात त्यांच्या विचारांचे महत्त्व कायम आहे. तुकडोजी महाराजांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही योगदान दिले. ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनजागृती करण्यासाठी त्यांनी आपल्या भजनांचा आणि कीर्तनांचा उपयोग केला. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात त्यांनी स्वातंत्र्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला. देश स्वतंत्र व्हावा आणि भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे अनेक लोकांमध्ये देशप्रेमाची भावना वाढीस लागली. समाजातील अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढींना त्यांनी विरोध केला. जातिभेद आणि अस्पृश्यता यांमुळे समाजात निर्माण होणारी दरी दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. सर्व धर्मांचा आदर करणे, एकमेकांशी प्रेमाने वागणे आणि समाजात बंधुभाव वाढवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवन जगावे, मुलांना शिक्षण द्यावे आणि महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी, असे विचारही त्यांनी मांडले. समाजसेवेचे कार्य संघटित पद्धतीने पुढे नेण्यासाठी त्यांनी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता, श्रमदान, सामुदायिक प्रार्थना आणि समाजप्रबोधनाचे उपक्रम राबविण्यात आले. लोकांनी स्वतःच्या प्रगतीबरोबरच समाजाच्या विकासासाठीही काम करावे, हा या कार्यामागील मुख्य उद्देश होता. त्यांच्या कार्यामुळे अनेक कार्यकर्ते समाजसेवेच्या मार्गावर आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते. आजही ग्रामीण भागातील विकास, स्वच्छता, शिक्षण, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसाठी त्यांचे विचार मार्गदर्शक आहेत. तरुण पिढीने त्यांच्या विचारांचा अभ्यास करून समाजातील समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडल्यास समाज अधिक सक्षम होऊ शकतो, हा त्यांचा संदेश होता. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ११ ऑक्टोबर १९६८ रोजी गुरुकुंज आश्रम, मोझरी येथे महानिर्वाण झाले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून नागपूर विद्यापीठाला 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ' असे नाव देण्यात आले.

'अर्णब' चक्रीवादळाचा आंध्र, ओडिशात प्रचंड हाहाकार

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

बंगालच्या उपसागरात आकारास आलेल्या 'अर्णब' या अतितीव्र चक्रीवादळाने मंगळवारी आंध्र प्रदेशच्या किनारी भागात धडक देत प्रचंड तांडव मांडले आहे. किनारपट्टीवर ताशी १२५ ते १३५ किलोमीटरच्या वादळी वेगाने वाहणारे वारे आणि मुसळधार पावसामुळे मोठे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत आंध्र प्रदेशात तीन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून सुमारे ३१ घरांची मोठी पडझड झाली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने युद्धपातळीवर आपत्कालीन उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. या चक्रीवादळाचा सर्वाधिक फटका विशाखापट्टणम शहराला बसला आहे. शहरात अवघ्या १८ तासांच्या कालावधीत २०० मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊस जुलै महिन्यातील सरासरी पर्जन्यमानाच्या (१३३ मिमी) दीड पटीपेक्षा अधिक आहे. पावसाच्या या धुमाकूळामुळे दळणवळण व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली आहे. विजयवाडा आणि विशाखापट्टणम विमानतळांवरून उड्डाण करणारी २१ विमाने तातडीने रद्द करण्यात आली आहेत. सुमारे ५० रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या असून विशाखापट्टणम-किरंदुल, राउरकेला-जगदलपूर आणि हिराखंड एक्सप्रेससह २२ प्रमुख गाड्यांच्या फेऱ्या ५ नोव्हेंबरपर्यंत रद्द किंवा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. काही गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी 'NTES' प किंवा भारतीय रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावरून खात्री करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे. आपत्तीच्या काळात जीवितहानी टाळण्यासाठी आंध्र प्रदेशातून ५७ हजार आणि ओडिशामधून ३० हजार अशा एकूण ८७ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. बाधित नागरिकांच्या निवासासाठी दोन्ही राज्यांमध्ये मिळून तब्बल ४ हजार चक्रीवादळ निवारा केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत. सुरक्षेचा उपाय म्हणून ओडिशातील १६ जिल्ह्यांमधील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दुसरीकडे, भारतीय हवाई दलानेही बचावकार्यात मोलाचे योगदान दिले आहे. हवाई दलाच्या दोन 'सी-१३० जे' (C-130J) विमानांद्वारे विजयवाडा येथे २३ टन मदत साहित्य आणि एनडीआरएफचे विशेष पथक तातडीने पाठवण्यात आले आहे.

स्वर्गीय इंदिरा गांधी यांना शनिवारी अमृत उद्योग समूहाच्यावतीने अभिवादन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारताच्या माजी पंतप्रधान तथा आयर्न लेडी स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या ४२ व्या स्मृतिदिनानिमित्त अमृत उद्योग समूहाच्या वतीने शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वा. शक्तीस्थळ अमृतनगर येथे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात ,माजी आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये अभिवादन करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, स्वर्गीय इंदिरा गांधी यांचे देशाच्या उभारणीत मोलाचे योगदान आहे. पाकिस्तानला धडा शिकवत बांगलादेशची निर्मिती करणाऱ्या इंदिरा गांधी यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणास्रोत असलेल्या इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन दरवर्षी कारखाना कार्यस्थळावर साजरा करण्यात येतो यानिमित्त वेगवेगळ्या मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली जातात. यावर्षी शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात ,मा आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये अभिवादन करण्यात येणार आहे या कार्यक्रमासाठी ॲड. माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, बाबासाहेब ओहोळ, सुधाकर जोशी, शंकरराव खेमनर, संपतराव डोंगरे, इंद्रजीत थोरात, रामहरी कातोरे, राजेंद्र गुंजाळ, राजेंद्र कडलग, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी या अभिवादन कार्यक्रमासाठी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी व अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते युवक नागरिक व महिला यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सर्व संचालक मंडळ कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.

जोर्वेच्या समता विद्या मंदिरात राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी०

जोर्वे - भारत सरकारच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील समता विद्या मंदिर व शिल्पवेत्ता मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना अल्बेंडाझोल या जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. तसेच जंतसंसर्गाचे दुष्परिणाम आणि जंतनाशक गोळ्यांचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यालयात आयोजित कार्यक्रमात नोडल शिक्षक राजेंद्र गिते यांनी राष्ट्रीय जंतनाशक दिन आणि राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेची सविस्तर माहिती दिली. एक ते १९ वर्षे वयोगटातील बालके आणि किशोरवयीन मुलांना जंतसंसर्गापासून सुरक्षित ठेवण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अल्बेंडाझोल गोळीचे महत्त्व स्पष्ट करताना गिते म्हणाले की, शरीरातील जंतांचा नाश झाल्यामुळे रक्तक्षय आणि कुपोषणाचा धोका कमी होण्यास मदत होते. तसेच भूक वाढणे, रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत होणे आणि मुलांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाला चालना मिळणे असे फायदे होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जंतनाशक मोहिमेत सहभागी होऊन आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. जंतनाशक गोळी घेताना योग्य काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. गोळी उपाशीपोटी न घेता जेवणानंतर घ्यावी आणि ती व्यवस्थित चावून खावी, असे त्यांनी सांगितले. गोळी घेतल्यानंतर काही विद्यार्थ्यांना मळमळ, पोटात हलकी वेदना किंवा थकवा जाणवू शकतो. मात्र, अशी लक्षणे सामान्यतः तात्पुरती असतात. त्रास अधिक जाणवल्यास आरोग्य कर्मचाऱ्यांचा सल्ला घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

२७ ऑक्टोबर रोजी काही कारणास्तव जंतनाशक गोळी घेता न आलेल्या विद्यार्थ्यांना ३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित मॉप-अप दिनी गोळी घेण्याची संधी उपलब्ध असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

विद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी प्राचार्य भारत हासे, पर्यवेक्षक विठ्ठल तांबे, आदिराज भांगरे, भाऊराव भांगरे यांच्यासह सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांचे योगदान लाभले. तसेच जोर्वे प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही मोहिमेसाठी सहकार्य केले.

अर्चना नेहे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील सावरगाव तळ येथील सौ अर्चना शांताराम नेहे वय ४५ यांचे नुकतेच आकस्मित निधन झाले आहे. सौ. अर्चना या आपले छोटेसे किराणा दुकान आणि शिलाई मशीन चालवून आपल्या कुटुंबाचा उदार निर्वाह भागवत होत्या. तर पती हे एका कृषी कंपनीत मार्केटिंगचे तसेच दूध संस्था चालविण्याचे काम करत आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सासरे, दीर, भाया, जावा असा मोठा परिवार आहे. त्यांच्या झालेल्या अकस्मिक निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे प्रगतशील शेतकरी आणि व्यापारी शांताराम नेहे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या अंत्यविधीला कृषी राजकीय सामाजिक शैक्षणिक व्यापारी क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत पळसपूर तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर ही ग्रामपंचायत निविदा दिनांक २८. १०. २०२४ रोजी दैनिक युवावार्ता अंकामध्ये प्रकाशित करण्यात आली असून तिच्या ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक यामध्ये गावाचे नाव नजरचुकीने सांगवी सूर्या असे झाले असून ते पळसपूर असे वाचावे .

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रा.पं. पळसपूर, ता. पारनेर, जि. अ.नगर

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ मृत्यू नोंद/६४०/२०२६ दिनांक - २७/१०/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. बाळासाहेब भिका पवार रा. रहिमपूर** यांनी **दिनांक १५/१०/२०२६** रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा.रहिमपूर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची **स्वत: नामे हिराबाई भिका पवार** यांचा **मृत्यू** मौजे **रहिमपूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे दिनांक २५/०२/२०२५ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी रहिमपूर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी रहिमपूर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. अभिजित भिकाजी मुळे, रा. नविन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -- सि. स. नं. -- स.नं. ४६४८/अ,१ या ठिकाणी मध्ये निरामय नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २८/१०/२०२६ **मुख्याधिकारी - संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

युवावार्ता
छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
- कार्यालयीन प्रशासक – १
- आयटी प्रोफेशनल – १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract - mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

पाहिजेत
ऑफिसबॉय (शिपाई)
02 जागा (पुरुष)
शैक्षणिक पात्रता - 10/12 वी पास
वय मर्यादा - 20 ते 40 वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दिनांक 26/10/2026 पर्यंत जमा करावे
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अशोक चौक, संगमनेर
फोन नं. 02425-220777
9623017997
Email- mahesh.patsanstha@gmail.com

कामगार भरती
अकाउंटंट - 0१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- 0५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- 0१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

पाहिजेत
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

SR THORAT
पाहिजेत
मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक
आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७

‘मोस्ट इम्पॅक्टफुल वुमन लीडर्स इन इंडिया’ या सन्मानाने श्रेया मालपाणी यांचा गौरव

इमॅजिका येथील कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या हुरून इंडियाच्या वतीने श्रेया मालपाणी यांना ‘मोस्ट इम्पॅक्टफुल वुमन लीडर्स इन इंडिया’ या सन्मानाने गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथे आयोजित प्रतिष्ठित सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. श्रेया मालपाणी यांच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेल्याने मालपाणी कुटुंबीयांसह त्यांच्या हितचिंतकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

श्रेया मालपाणी या इमॅजिका येथील आपल्या कार्यातून योगदान देत आहेत. त्यांच्या कामातील समर्पण, मेहनत आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल या सन्मानाच्या निमित्ताने घेण्यात आली. विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या महिलांमध्ये त्यांचा समावेश झाल्याने त्यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण ओळख मिळाली आहे.

या सन्मानाचे विशेष महत्त्व म्हणजे हुरून इंडिया ही संशोधनाधारित मान्यता आणि विविध क्षेत्रांतील व्यक्ती व संस्थांच्या कामगिरीविषयीच्या अभ्यासासाठी ओळखली जाणारी संस्था आहे. तिच्या वतीने दिल्या जाणाऱ्या मान्यतांमध्ये विविध क्षेत्रांत प्रभावी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेतली जाते. त्यामुळे श्रेया मालपाणी यांना मिळालेला हा गौरव त्यांच्या कार्याची दखल घेणारा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

या प्रतिष्ठित यादीत श्रेया मालपाणी यांच्यासह आदित्य बिर्ला समूहाशी संबंधित अनन्या बिर्ला, सोना कॉमस्टारशी संबंधित प्रिया कपूर आणि सारेगामा समूहाशी संबंधित अवर्णा जैन यांच्यासारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचाही समावेश असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. उद्योग, व्यवसाय आणि अन्य क्षेत्रांत आपल्या कार्यातून प्रभाव निर्माण करणाऱ्या या महिलांच्या कामगिरीमुळे या गौरवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्रेया मालपाणी यांच्या या यशाबद्दल उद्योजक मनिष मालपाणी, नगरसेविका रचनाताई मालपाणी, जय मालपाणी आणि सर्व मालपाणी परिवाराने त्यांच्या कार्याचे कौतुक केले. इमॅजिका येथील त्यांच्या मेहनतीची, समर्पणाची आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. तसेच श्रेया यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

महिलांनी विविध क्षेत्रांत स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर निर्माण केलेली ओळख समाजासाठी प्रेरणादायी ठरत असते. श्रेया मालपाणी यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या कार्याचा गौरव करणारा असून, इतर महिलांनाही आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या या यशामुळे मालपानी कुटुंबीय आणि हितचिंतकांसाठी हा क्षण अभिमानाचा ठरला आहे.

निसर्ग वाचविण्यासाठी एकत्र या मनोज जरांगे यांचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

कर्जत- रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात टोरंट कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी सुरू सलेल्या वृक्षतोडीचा मुद्दा आता राज्यभर चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी बुधवारी (ता. २८) वृक्षतोडीच्या ठिकाणी भेट देत स्थानिकांशी संवाद साधला. कोकणातील निसर्गसंपदा वाचविण्यासाठी सर्वांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. कर्जत दहिवली येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारकाला पुष्पहार अर्पण करून त्यांचा गाड्यांचा ताफा साय डोंगर या जंगलात पोहोचला. हा लढा टिकवणारे पर्यावरण समितीचे ॲड. कैलास मोरे आणि पाली ग्राम संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रसाद देशमुख यांनी त्यांना प्रकल्पाची माहिती देत स्थानिकांच्या चिंता मांडल्या. हा प्रकल्प म्हणजे आमच्यावर आलेले अस्मानी संकट असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

जरांगे म्हणाले, सध्या मराठवाडा आणि विदर्भात पाणीटंचाईचे संकट आहे. कोकणातही अशी परिस्थितीनिर्माण होऊ शकते. त्यामुळे विकासाच्या नावाखाली झाडे तोडताना पर्यावरणाचा विचार करणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी वृक्षतोडीनंतर शुद्ध हवा आणि प्रदूषणमुक्त वातावरण कसे राहणार, असा सवालही त्यांनी यावेळी केला. मराठा समन्वयक मधुकर घारे, राजेश लाड, अनिल भोसले, उमेश म्हसे यांनीसुद्धा वृक्षतोडीबाबत संतप्त भावना व्यक्त केल्या. शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांनीही या लढ्याला पाठिंबा दर्शविला.

उपजिल्हाधिकाऱ्यांना वाहनाखाली ढकलले, ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अवैध मुरूम उत्खनन आणि वाळू तस्करीवर कारवाईसाठी गेलेल्या महसूल अधिकाऱ्यांनी डंपर पकडला. यामुळे रिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी विनीत क्रांत शिर्के यांना डंपरच्या चाकाखाली ढकलून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी (दि. २७) सायंकाळी - पिंपळगाव फुणगी परिसरात घडली. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध राहुरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शिर्के हे प्रवरा नदीपात्रातील अधिकृत वाळू लिलावाच्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी मालुंजा येथे गेले होते. तेथून चिंचोलीकडे जात असताना पिंपळगाव फुणगी शिवारात त्यांना विना क्रमांकाचा डंपर मुरूम वाहतूक करताना दिसला. त्यांनी डंपर अडवून चालक धनराज चौधरी याला तो तहसील कार्यालयात नेण्यास सांगितले. दरम्यान, सहा जणांनी दुचाकींवरून डंपरचा पाठलाग करत त्याला रस्त्यात अडविले.

खाली ओढल्यानंतर चाकाखाली शिर्के यांना धक्काबुक्की करून ढकलण्यात आले. प्रसंगावधान राखत त्यांनी रस्त्याच्या कडेला उडी मारून जीव वाचविला. त्यानंतर आरोपी डंपर घेऊन पसार झाले. शिर्के आणि त्यांच्या चालकाने सुमारे २० किलोमीटर पाठलाग केला; मात्र आरोपी हाती लागले नाहीत.

या प्रकरणी डंपर चालक धनराज चौधरी, मालक दीपक ऊर्फ प्रवीण लाटे आणि सहा अनोळखी व्यक्तींविरुद्ध जीवे मारण्याच्या प्रयत्नासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख पुढील तपास करत आहेत.

साकूरच्या तीन सहकारी संस्थांकडून सभासदांना दिवाळीची भेट

युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - दिवाळीचा सण गोड व्हावा, सभासदांच्या आनंदात भर पडावी आणि सहकाराच्या माध्यमातून सभासदांशी असलेले नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने साकूर येथील विविध सहकारी संस्थांच्या वतीने दरवर्षी दिवाळीनिमित्त सभासदांना लाभांश व साखरेचे वाटप करण्यात येते. यंदाही कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर यांच्या मार्गदर्शनाखाली साकूर सोसायटी, मुळाखोरे पतसंस्था आणि वीरभद्र मुळाखोरे दूध संस्थेच्या माध्यमातून सुमारे ५५०० सभासदांना दिवाळीची भेट देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण असून, सहकाराच्या माध्यमातून सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

साकूर सोसायटीच्या सभागृहात या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थांच्या सभासदांसाठी लाभांश, साखर, साबण आणि इतर साहित्याचे वाटप जाहीर करण्यात आले. साकूर परिसरातील सहकारी संस्थांच्या माध्यमातून दरवर्षी राबविण्यात येणारा हा उपक्रम यंदाही कायम ठेवण्यात आला आहे.

साकूर सोसायटीच्या सुमारे २५०० सभासदांना प्रत्येकी दोन किलो साखरेचे वाटप करण्यात

येणार आहे. मुळाखोरे पतसंस्थेच्या सुमारे १५०० सभासदांना १३ टक्के लाभांश, दोन किलो साखर, एक संतूर साबण आणि एक पिशवी देण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे वीरभद्र मुळाखोरे दूध संस्थेच्या सुमारे १५०० सभासदांना १५ टक्के लाभांश, दूधपुरवठ्याशी संबंधित दोन रुपये प्रतिलिटरप्रमाणे रिबेट, दोन किलो साखर आणि एक संतूर साबण देण्यात येणार आहे. या तिन्ही संस्थांच्या माध्यमातून जवळपास ५५०० सभासदांना या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सभासदांना लाभांशासह जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याची परंपरा संस्थांनी यंदाही जपली आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या कामकाजातून सभासदांना आर्थिक लाभासोबतच सणाच्या आनंदात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न होत आहे.

माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर यांच्या नेतृत्वाखाली साकूर येथील सहकारी संस्थांचे कामकाज सुरू आहे. दिवाळीच्या निमित्ताने सभासदांना लाभांश आणि साखरेचे वाटप करण्याची परंपरा या संस्थांनी कायम ठेवली आहे. यंदाही सभासदांना लाभांशासह विविध वस्तूंचे वाटप करण्याच्या माध्यमातून दिवाळीचा आनंद वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दिनविशेष

२०१३: सचिन तेंडुलकर — यांनी क्रिकेट career ची शेवटची रणजी मॅच खेळली.

१९९५: — कॅनडातील क्&#xd वेबेक प्रांताने विभक्त होण्यासाठी घेतलेल्या सार्वमतात जनतेने ५०.६% विरुद्ध ४९.४% मतांनी कॅनडातच राहण्याचा निर्णय दिला.

१९७३: — इस्तंबुलमधील बॉस्पोरस पूल पूर्ण झाल्यामुळे युरोप आणि आशिया जोडले गेले.

१९६६: शिवसेना — पहिला दसरा मेळावा शिवाजी पार्क, मुंबई मधे साजरा झाला.

१९४५: भारत — देशला संयुक्त राष्ट्रांचे (United Nations) सदस्यत्त्व मिळाले.

१९२८: — लाहोर येथे सायमन कमिशनचा निषेध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर ब्रिटिश पोलिसांनी लाठीहल्ला केला.

१९२०: — सिडनी येथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ ऑस्ट्रेलियाची स्थापना.

जन्म

१९६९: स्टॅनिस्लाव ग्रॉस — झेक प्रजासत्ताक देशाचे ५वे पंतप्रधान (निधन: १६ एप्रिल २०१५)

१९६०: डिएगो मॅराडोना — अर्जेंटिनाचे फूटबॉलपटू

१९५१: त्रिलोक गुर्टू — भारतीय ड्रमर आणि गीतकार

१९४९: प्रमोद महाजन — केंद्रीय मंत्री व राज्यसभा खासदार (निधन: ३ मे २००६)

१९३२: बरुन डी — भारतीय इतिहासकार आणि लेखक (निधन: १६ जुलै २०१३)

१९२९: आर. एस गवई — भारतीय वकील आणि राजकारणी (निधन: २५ जुलै २०१५)

१९१४: लेबुआ जोनाथन — लेसोथो देशाचे २रे पंतप्रधान (निधन: ५ एप्रिल १९८७)

१९०९: होमी जहांगीर भाभा — भारतीय भौतिकशास्त्रज्ञ — पद्म भूषण (निधन: २४ जानेवारी १९६६)

१८९५: डिकिन्सन डब्ल्यू. रिचर्ड्स — अमेरिकन डॉक्टर आणि फिजिओलॉजिस्ट — नोबेल पारितोषिक (निधन: २३ फेब्रुवारी १९७३)

मृत्यू

२०११: अरविंद मफतलाल — उद्योगपती (जन्म: २७ ऑक्टोबर १९२३)

२००५: शम्मीशेर सिंह शेरी — भारतीय राजकारणी

१९९८: विश्राम बेडेकर — लेखक व दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १९०६)

१९९७: सिडनी न्यूमन — कॅनेडियन पटकथा लेखक आणि निर्माते (जन्म: १ एप्रिल १९१७)

१९९६: भाऊ पाध्ये — लेखक, पत्रकार (जन्म: २९ नोव्हेंबर १९२६)

१९९४: स्वर्ण सिंग — भारतीय राजकारणी आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील वरिष्ठ नेते सरदार — पद्मविभूषण (जन्म: १९ ऑगस्ट १९०७)

१९९३: पीटर केम्प — भारतीय-इंग्रजी सैनिक आणि लेखक (जन्म: १९ ऑगस्ट १९१३)

१९९०: व्ही. शांताराम — चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते (जन्म: १८ नोव्हेंबर १९०१)

१९९०: विनोद मेहरा — अभिनेते (जन्म: १३ फेब्रुवारी १९४५)

१९७४: बेगम अख्तर — भारतीय गायिका आणि अभिनेत्र, गझल, ठुमरी व दादरा गायनासाठी मल्लिका-ए-गझल म्हणून प्रसिद्ध — पद्मभूषण, पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (जन्म: ७ ऑक्टोबर १९१४)

१९१०: हेनरी डूनेंट — रेड क्रॉस संस्थेचे सहसंस्थापक (जन्म: ८ मे १८२८)

दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

३० ऑक्टोबर

१९४५ : भारताला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्व मिळाले

संयुक्त राष्ट्र संघटना ही जगातील विविध देशांमध्ये शांतता, सुरक्षा, सहकार्य आणि विकास प्रस्थापित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय संघटना आहे. दुसऱ्या महायुद्धामुळे जगभर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि सामाजिक अस्थिरता निर्माण झाली होती. भविष्यात असे विनाशकारी युद्ध होऊ नये, तसेच देशांमधील वाद शांततामय मार्गाने सोडवता यावेत, या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. भारत हा या संघटनेचा संस्थापक सदस्य देश आहे. भारताला १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली.दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जगातील अनेक देशांना शांतता आणि सुरक्षिततेसाठी एका प्रभावी आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता जाणवली. १९४१ मध्ये अटलांटिक सनद, १९४२ मध्ये संयुक्त राष्ट्रांची घोषणा आणि त्यानंतर झालेल्या विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमधून या संघटनेची संकल्पना विकसित झाली. एप्रिल ते जून १९४५ या काळात अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत ५० देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेत संयुक्त राष्ट्रांच्या सनदेचा मसुदा तयार करण्यात आला आणि २६ जून १९४५ रोजी सनदेवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.भारत त्या वेळी ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असला, तरी त्याला स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राचा दर्जा मिळण्यापूर्वीच संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेत सहभागी होता आले. त्यामुळे भारताची संयुक्त राष्ट्रांच्या संस्थापक सदस्यांमध्ये गणना होते. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेला आवश्यक देशांनी मान्यता दिल्यानंतर २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटना अधिकृतपणे अस्तित्वात आली. म्हणूनच दरवर्षी २४ ऑक्टोबर हा दिवस 'संयुक्त राष्ट्र दिन' म्हणून साजरा केलाजातो. संयुक्त राष्ट्रांमधील भारताची भूमिकाभारताने संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय शांतता, मानवाधिकार, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास यांसारख्या विषयांवर सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने वसाहतवादाच्या समाप्तीसाठी, वर्णभेदाविरुद्ध आणि सर्व देशांना समान अधिकार मिळावेत यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर आवाज उठवला. भारताने अनेक शांतता मोहिमांमध्ये सैनिक आणि वैद्यकीय पथके पाठवून योगदान दिले आहे.भारताच्या परराष्ट्र धोरणात शांततापूर्ण सहअस्तित्व, परस्पर सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर या तत्त्वांना महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विविध संस्थांमध्ये भारताने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, दारिद्र्यनिर्मूलन आणि शाश्वत विकास यांसारख्या विषयांवर सहकार्य केले आहे. विकसनशील देशांच्या समस्या जागतिक व्यासपीठावर मांडण्यातही भारताने पुढाकार घेतला.

पीटर केम्प - भारतीय वंशाचे ब्रिटिश सैनिक आणि लेखक

पुण्यतिथी विशेष

पीटर मँट मॅकइंटायर केम्प हे ब्रिटिश सैन्यातील अधिकारी, युद्धातील सहभागी आणि लेखक होते. त्यांचा जन्म १९ ऑगस्ट १९१५ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे वडील ब्रिटिश भारतात न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. पीटर केम्प यांचे जीवन युद्ध, साहसी मोहिमा आणि लेखन यांशी संबंधित होते. त्यांनी स्पॅनिश गृहयुद्ध आणि दुसऱ्या महायुद्धात सहभाग घेतला. युद्धातील अनुभवांवर त्यांनी पुस्तके लिहिली. ३० ऑक्टोबर १९९३ रोजी लंडन येथे त्यांचे निधन झाले.पीटर केम्प यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण इंग्लंडमधील वेलिंग्टन महाविद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. त्यांनी अभिजात साहित्य आणि कायद्याचा अभ्यास केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते वकिलीच्या क्षेत्रात काम करण्याचा विचार करत होते. मात्र, १९३६ मध्ये स्पेनमध्ये गृहयुद्ध सुरू झाल्याने त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले.स्पॅनिश गृहयुद्धात पीटर केम्प

यांनी जनरल फ्रान्सिस्को फ्रँको यांच्या राष्ट्रवादी सैन्याच्या बाजूने सहभाग घेतला. या युद्धात त्यांनी प्रत्यक्ष लढाईचा अनुभव घेतला. युद्धादरम्यान त्यांना गंभीर दुखापत झाली. १९३८ मध्ये तोफगोळ्याच्या स्फोटामुळे त्यांच्या जबड्याला दुखापत झाली आणि उपचारांसाठी त्यांना इंग्लंडला परतावे लागले. या अनुभवांचा त्यांच्या पुढील जीवनावर मोठा परिणाम झाला.दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर पीटर केम्प यांनी ब्रिटिश सैन्यात सेवा बजावली. ते ब्रिटनच्या स्पेशल ऑपरेशन्स एक्झिक्युटिव्ह या गुप्त मोहिमांसाठी कार्यरत असलेल्या संस्थेशी संबंधित होते. या संस्थेचे काम शत्रूच्या ताब्यातील प्रदेशांमध्ये गुप्त मोहिमा राबवणे आणि स्थानिक प्रतिकार चळवळींना मदत करणे असे होते. केम्प यांनी फ्रान्स, अल्बानिया आणि पोलंड यांसारख्या देशांमध्ये धोकादायक मोहिमांमध्ये भाग घेतला. पोलंडमधील एका मोहिमेदरम्यान त्यांना सोव्हिएत सैन्याने ताब्यात घेतले होते. काही काळानंतर त्यांची सुटका झाली. युद्धातील कामगिरीबद्दल त्यांना ब्रिटिश सैन्याचे मिलिटरी क्रॉस आणि डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस ऑर्डर हे सन्मान मिळाले.युद्धानंतर पीटर केम्प यांनी लेखन आणि पत्रकारितेला सुरुवात केली. त्यांनी विविध देशांतील राजकीय घडामोडी, युद्धे आणि संघर्ष यांचा अभ्यास केला. त्यांनी हंगेरीतील १९५६ च्या उठावासह आफ्रिका, आशिया आणि मध्य व दक्षिण अमेरिकेतील घटनांचे वृत्तांकन केले. त्यांच्या लेखनात युद्धातील प्रत्यक्ष अनुभव, सैनिकांचे जीवन आणि राजकीय परिस्थिती यांचे वर्णन आढळते.पीटर केम्प यांनी अनेक पुस्तके लिहिली. Mine Were of Trouble हे त्यांचे प्रसिद्ध पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी स्पॅनिश गृहयुद्धातील अनुभव मांडले आहेत. No Colours or Crest या पुस्तकात दुसऱ्या महायुद्धातील गुप्त मोहिमांचे वर्णन केले आहे. Alms for Oblivion आणि The Thorns of Memory ही त्यांची अन्य पुस्तके आहेत. त्यांच्या पुस्तकांमधून विसाव्या शतकातील युद्धे आणि राजकीय संघर्षांची माहिती मिळते.पीटर केम्प यांनी आपल्या आयुष्यात सैनिक, गुप्त मोहिमांतील सहभागी आणि लेखक म्हणून काम केले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

सणासुदीच्या काळात एफडीआयची धडक कारवाई सुरू

कोपरगावमध्ये दोन अस्थापनांवर कारवाई, ३.५ लाखांचा खाद्यसाठा जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव- सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत २७ ऑक्टोबर रोजी कोपरगाव येथील दोन अन्न व्यावसायिकांच्या आस्थापनांवर छापे टाकून सुमारे ३ लाख ५८ हजार ४७४ रुपयांचा खाद्यपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. यामध्ये रिफाईंड सोयाबीन तेल, मिक्स्ड मसाला पावडर आणि स्पेशल मिरची पावडरचा समावेश आहे. जप्त केलेला साठा निकृष्ट दर्जाचा असल्याचा संशय, लेबलिंग नियमांचे उल्लंघन आणि अस्वच्छ परिस्थितीत साठवणूक केल्याच्या कारणांवरून ही कारवाई करण्यात आली.

सोयाबीन तेलाचा २.३७ लाखांचा साठा जप्त

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने कोपरगाव येथील लक्ष्मी किराणा स्टोअर येथे तपासणी केली. या वेळी 'व्हाईट पल' ब्रँडच्या रिफाईंड सोयाबीन तेलाचा १,१६८.४ किलो साठा आढळून आला. या साठ्याची किंमत सुमारे २ लाख ३७ हजार रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली. तेलाचा साठा निकृष्ट दर्जाचा असल्याचा संशय तसेच अस्वच्छ वातावरणात साठवणूक केल्यामुळे तो जप्त करण्यात आला.

मसाले आणि मिरची पावडरवरही कारवाई

दुसरी कारवाई कोपरगाव येथील रिनाज मसाला ड्राय फ्रूट अँड राईस सेंटर येथे करण्यात आली. तपासणीदरम्यान 'ए. ए. स्पायसेस'च्या मिक्स्ड मसाला पावडरचा ८८ किलो साठा, ज्याची किंमत ५२ हजार ८०० रुपये आहे, तसेच 'सात्विक' ब्रँडच्या स्पेशल मिरची पावडरचा १७१ किलो साठा, ज्याची किंमत ६८ हजार ४०० रुपये आहे, जप्त करण्यात आला. या दोन्ही पदार्थांची एकूण किंमत १ लाख २१ हजार २०० रुपये आहे.

या ठिकाणी अन्नपदार्थांच्या लेबलिंग नियमांचे उल्लंघन झाल्याचे तसेच पदार्थ निकृष्ट दर्जाचे असण्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्याचबरोबर अस्वच्छ व आरोग्यास अपायकारक परिस्थितीत साठवणूक केल्याच्या कारणावरून ही कारवाई करण्यात आली.

सणासुदीत अन्नपदार्थांच्या गुणवत्तेवर लक्ष

दिवाळीसह सण-उत्सवांच्या काळात खाद्यतेल, मसाले आणि इतर अन्नपदार्थांची मागणी वाढते. या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांची गुणवत्ता, साठवणुकीची स्वच्छता आणि पॅकिंगवरील माहिती यांची तपासणी करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये नियमांचे पालन होणे आवश्यक असून, अन्न व्यवसायिकांनी स्वच्छतेचे निकष आणि अन्नसुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे, सहआयुक्त (अन्न) एम. यू. माने आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी के. डी. जगदाळे आणि सहाय्यक आयुक्त भोईटे यांच्या पथकाने तपासणी व जप्तीची कारवाई केली.

सण-उत्सव विशेष तपासणी मोहिमेमुळे खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचा आणि सुरक्षित साठवणुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांनी खाद्यपदार्थ खरेदी करताना उत्पादनाची मुदत, पॅकिंगवरील माहिती आणि साठवणुकीची स्थिती तपासावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

राहुरीत ६ लाखांचे सोयाबीन तेल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहुरी - सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत राहुरी येथील आनंद ट्रेडिंग कंपनीवर छापा टाकून तब्बल ६ लाख २१ हजार ६०० रुपये किमतीचा रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित तेल कमी दर्जाचे (सबस्टँडर्ड) असल्याचा संशय तसेच लेबलिंग नियमांचे उल्लंघन झाल्याच्या कारणावरून ही कारवाई करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे, सहआयुक्त (अन्न) एम. यू. माने आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) ए. ए. भोईते यांच्या मार्गदर्शनाखाली २६ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली. राहुरी तालुक्यातील आनंद ट्रेडिंग कंपनी येथे तपासणीदरम्यान विविध प्रकारच्या रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा आढळून आला.

तीन प्रकारच्या तेलाचा साठा जप्त

या कारवाईत नवकार ब्रँडचे ६०० लिटर रिफाइंड सोयाबीन तेल, ज्याची किंमत १ लाख ८ हजार रुपये आहे, जप्त करण्यात आले. तसेच आनंद ब्रँडचे २ हजार १०० किलो रिफाइंड सोयाबीन तेल, ज्याची किंमत ४ लाख २० हजार रुपये आहे, आणि याच ब्रँडचे आणखी ४६८ किलो तेल, ज्याची किंमत ९३ हजार ६०० रुपये आहे, असा एकूण ६ लाख २१ हजार ६०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

सणासुदीच्या काळात प्रशासनाची विशेष नजर

सण-उत्सवांच्या काळात खाद्यतेलासह विविध अन्नपदार्थांची मागणी वाढते. या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि पॅकिंगवरील माहितीचे नियम पाळले जात आहेत की नाही, याची तपासणी प्रशासनाकडून केली जात आहे. कमी दर्जाचे अन्नपदार्थ बाजारात विक्रीस येऊ नयेत आणि ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड होऊ नये, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

या प्रकरणात अन्न सुरक्षा अधिकारी यू. आर. पाटील आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) ए. ए. भोईते यांनी माहिती संकलन करून छापा कारवाई केली. जप्त केलेल्या तेलाच्या दर्जाबाबत संशय व्यक्त करण्यात आला असून, नमुन्यांच्या तपासणीअंती गुणवत्ता आणि नियमभंगाबाबतची स्थिती स्पष्ट होणार आहे.

सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांची खरेदी करताना ग्राहकांनी पॅकिंगवरील माहिती, उत्पादन व अंतिम वापराची तारीख आणि संबंधित तपशील तपासूनच खरेदी करावी, असे आवाहन या कारवाईच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नगरपालिकेची अतिक्रमणांवर धडक कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरातील लोणी रस्त्यावरील पंचायत समिती परिसरात रस्त्याच्या कडेला थाटण्यात आलेल्या अनधिकृत अतिक्रमणांविरोधात नगरपालिकेने धडक कारवाई केली. नगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने रक्षक दलाच्या जवानांच्या मदतीने संयुक्त मोहीम राबवत रस्त्यालगतची अतिक्रमणे हटविली. या कारवाईमुळे परिसरातील रस्ता मोकळा झाला असून, अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली.

संगमनेर शहरातील लोणी रस्ता हा वर्दळीचा मार्ग असून, पंचायत समिती परिसरात नागरिकांची तसेच वाहनांची नेहमीच मोठी ये-जा असते. या परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा अनेक दिवसांपासून अनधिकृत दुकाने, टपऱ्या, हातगाड्या तसेच तात्पुरते शेड उभारण्यात आले होते. त्यामुळे रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. परिणामी, वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत असल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमधून नाराजी व्यक्त केली जात होती. रस्त्यालगतची अतिक्रमणे हटवून वाहतुकीसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही नागरिकांकडून केली जात होती. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारला. नगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने रक्षक दलाच्या जवानांसह संबंधित परिसरात धडक देत अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविली. यावेळी जेसीबीसह आवश्यक साधनांच्या मदतीने रस्त्यालगत उभारण्यात आलेली अनधिकृत शेड, फलक आणि इतर तात्पुरती अतिक्रमणे हटविण्यात आली. या कारवाईमुळे रस्त्यालगतची जागा मोकळी झाली असून, वाहतुकीतील अडथळे दूर होण्यास मदत होणार आहे.

शहरातील रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्याच्या दृष्टीने नगरपालिकेने ही कारवाई केली आहे. यापुढेही सार्वजनिक रस्त्यांवर अनधिकृत दुकाने, टपऱ्या किंवा शेड उभारून वाहतुकीला अडथळा निर्माण केल्यास संबंधितांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा नगरपालिकेच्या वतीने देण्यात आला आहे. दरम्यान, शहरातील इतर वर्दळीच्या रस्त्यांवरील अतिक्रमणांचाही प्रश्न ऐरणीवर असून, नगरपालिकेने अशाच प्रकारची मोहीम सातत्याने राबवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25